# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

क.पुविमं / शाखा क / आवेदन / 3002
पुणे 411005.
दिनांक–19 / 06 / 2023

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा / विद्यालय,
जिल्हा–पुणे, अहमदनगर, सोलापूर.

विषय–जुलै–ऑगस्ट,2023 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ.10 वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखाना मुदतवाढ देणेंबाबत......
संदर्भ–जा.क.रा.मं. / परीक्षा–3 / 2537 दि.15 / 06 / 2023.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुनर्परीक्षार्थी,यापुर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणाऱ्या ,ITI( औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे ) Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ.10 वी)पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट,2023 मध्ये घेण्यात येणार आहे. त्यासाठी सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इ.10 वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाच्या तारखामध्ये मुदतवाढ देण्यात येत असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणेः–

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळामार्फत पुनर्परीक्षार्थी,यापुर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी(परीक्षेस प्रविष्ठ न झालेले), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे , ITI(.औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी )ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बॅंकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | शनिवार,दि.17 / 06 / 2023 ते बुधवार ,दि.21 / 06 / 2023 | गुरूवार दिनांक 08 / 06 / 2023 पासून सुरू असून सोमवार, दिनांक 26 / 06 / 2023 पर्यंत | मंगळवार दिनांक 27 / 06 / 2023 |
| विलंब शुल्क | गुरूवार, दि.22 / 06 / 2023 ते रविवार, दि.25 / 06 / 2023 | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी जुलै–ऑगस्ट–2023 मध्ये होणाऱ्या परीक्षेची आवेदन पत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फतच भरावीत.सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

1. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना मार्च–एप्रिल 2023 परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
2. उपरोक्त परीक्षेस प्रथमतः प्रविष्ठ झालेल्या व श्रेणी सुधार करू इच्छिणा–या विद्यार्थ्यांसाठी जुलै–ऑगस्ट,2023 व मार्च,2024 अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
3. सर्व माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बॅंक ऑफ इंडिया (Virtual Account) द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करून चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

4. नियमित शुल्कसह व विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावेत.

5. परीक्षा शुल्क **NEFT/RTGS** द्वारे भरणा केल्यानंतर सदर शुल्क पुनःश्च शाळेच्या खात्यावर जमा झालेले नाही ते मंडळाच्या खात्यावर वर्ग झाले आहेत.याची अंतिमतः खात्री करावी.

6. आवेदनपत्रे नियमित आणि विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

7.जुलै–ऑगस्ट, 2023 परीक्षेसाठी आवेदनपत्रे Online सादर केली आहेत . अशा पुनर्परीक्षार्थी/श्रेणीसुधार /आयसोलेटेड विद्यार्थ्यांच्या यापूर्वी प्रविष्ठ झालेल्या परीक्षांच्या गुणपत्रिकेची छायाप्रत साक्षांकित करून सादर करणे अनिवार्य आहे.सदर गुणपत्रिकेच्या वरील उजव्या कोपऱ्यात जुलै–ऑगस्ट,2023 परीक्षेचा विद्यार्थ्यांचा आवेदनपत्र कमांक लाल शाईमध्ये नमूद करावा. सदर गुणपत्रिकेचा बंच तयार करून याद्या व चलने विभागीय मंडळास जमा करतेवेळी सादर करावा.

8. विद्यार्थ्यांच्या याद्या व चलने निर्धारित मंगळवार दिनांक 27/06/2023 रोजी **विभागीय मंडळ कार्यालय पुणे** येथेच स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिवांकरिता,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत

1. मा.शिक्षण उपसंचालक पुणे .माहितीसाठी तथा कार्यवाहीस्तव
2. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर, सोलापूर